# कल्याण वाहतूक उपविभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसुचना

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ९३३ /२०२५ — दि. ०४/०७/२०२५

## –: वाहतूक नियंत्रण अधिसुचना :–

**ज्याअर्थी, कल्याण** वाहतूक उपविभागाचे हद्दीत मुरबाड रस्त्यावरील रोशन पेट्रोलपंपा समोरील रस्त्याच्या मध्यभागी कल्याण पुर्व पश्चिमेला जोडणाऱ्या उड्डाण पुलावरील एम.एम.आर.डी.ए. मार्फत फाऊडेशन बांधकाम सुरु आहे. सदर खोदकाम करतेवेळी भुमीगत जलवाहीनी तसेच रस्त्याखालील चेंबर तुटलेला आहे. त्यामुळे मलवाहीनीतील पाणी रस्त्यावर येवुन दुर्गंधी परसरत आहे. त्याकरीता मलवाहीनी टाकणे तसेच चेंबर बांधतेवेळी सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी,** मी **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून खालील प्रमाणे वाहतुक नियंत्रण अधिसुचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद –** **१)** सुभाष चौक – कर्णीक रोड – सिंडीकेट मार्गे प्रेम ऑटोकडे जाणाऱ्या वाहनांना **आहेर ऑटो** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने वल्लभ टॉवर येथुन डावीकडे वळुन इंदिरा नगर मार्गे इच्छित स्थळी जातील.

सदरची वाहतूक नियंत्रण अधिसुचना दिनांक ०४/०७/२०२५ रोजी रात्रौ ००:०० वा. ते दिनांक १५/०७/२०२५ रोजी रात्रौ ००:०० वा. पावेतो अंमलात राहील.

सदरची वाहतूक नियंत्रण अधिसुचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

**( पंकज शिरसाट )**
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे
२/– सदरची अधिसुचनेस प्रसिध्दी देणेस विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सविनय सादर,**

– मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
– मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
– मा. अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, कल्याण
– मा. जिल्हाधिकारी, ठाणे
– मा. आयुक्त, कल्याण–डोंबिवली/उल्हासनगर व महानगरपालिका
– मा. आयुक्त, भिवंडी–निजामपुर शहर महानगरपालिका भिवंडी.
– मुख्य अभियंता, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, मुंबई
– पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–२/वि.शा.ठाणे.
– पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–३, कल्याण
– पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे शहर.
– उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, कल्याण.
– परिवहन व्यवस्थापक, कल्याण–डोंबिवली, महानगरपालिका

CamScanner

– विभाग नियंत्रण, राज्य परिवहन विभाग, ठाणे, कल्याण/विठठलवाडी.
– प्रादेशिक परिवहन अधिकारी भिवंडी, ठाणे.
– परिवहन व्यवस्थापक, भिवंडी
– विभाग नियंत्रक,महाराष्ट्र राज्य परिवहन, भिवंडी
– नियंत्रण कक्ष, ठाणे शहर/भिवंडी

प्रत :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
२/– सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

प्रत :– समन्वय अधिकारी, ९ ए.एस.कक्ष, ठाणे.
२/– सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

प्रत :– सपोआ, कल्याण, उल्हासनगर वाहतूक विभाग व प्रभारी अधिकारी, कल्याण/कोनगांव/कोळशेवाडी/विठठलवाडी/उल्हासनगर वाउपवि.

CamScanner